**<u>१८ व्या पिफ अंतर्गत होणा-या पत्रकार परिषदांमधील महत्वाचे मुद्दे -</u>**

पुणे फिल्म फाउंडेशन आणि महाराष्ट्र शासनाच्या संयुक्त विद्यमाने सुरु असलेल्या १८ व्या पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात आज शनिवार दि. ११ जानेवारी, २०२० दरम्यान झालेल्या पत्रकार परिषदांमधील महत्त्वाचे मुद्दे खाली देत आहोत. आज महोत्सवाचे कलात्मक दिग्दर्शक समर नखाते यांनी पत्रकार परिषदेसाठी उपस्थित दिग्दर्शक, कलाकार, निर्माते यांच्याशी संपर्क साधला.

१. चित्रपट - द सीड

उपस्थिती - रजनी बसुमतरी (निर्मात्या, दिग्दर्शक व अभिनेत्री)

- रजनी बसुमतरी या आसाममधील अभिनेत्री असून ‘द सीड’ हा चित्रपट बोडो भाषेतील आहे. ईशान्य भारत आणि त्यातही आसाममधील भागात ८० च्या दशकाच्या शेवटी व ९० च्या दशकाच्या सुरुवातीला जी घुसखोरी होत होती त्यावर व या काळातील सामाजिक परिस्थितीवर चित्रपटात भाष्य करण्यात आले आहे.

- स्वत:ची चुलत भावंडे इतकंच काय तर सख्खा भाऊ रजनी यांनी या संघर्षात गमावला. या चित्रपटाच्या माध्यमातून त्यांनी स्वत:चीच कथा सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

- या चित्रपटाच्या निर्मितीविषयी बोलताना त्या म्हणाल्या, आपली कथा सांगण्याची हिंमत खूप कमी लोकांमध्ये असते. माझ्या कुटुंबाने ही कथा आणि त्या संबंधीची सामाजिक स्थिती सांगण्यासाठी मला धैर्य आणि विश्वास दिला, म्हणून हे होऊ शकले.

- बोडोंच्या लढ्याबद्दल खूप कमी चित्रपट आहेत. इतकेच नाही तर बोडोंपर्यंत देखील हे चित्रपट पोहोचत नाही. हेच लक्षात घेत मी हा चित्रपट घेऊन गावोगाव फिरले. आजपर्यंत ५० गावांमधील तब्बल ४ लाख २० हजार नागारीकांपर्यंत पोहोचण्यात आम्ही यशस्वी झालो आहोत. अनेक गावांमध्ये चित्रपटगृह नाही, त्यामुळे प्रोजेक्टर घेऊन आम्ही प्रेक्षकांपर्यंत पोहोचत आहोत.

- चित्रपटामधील प्रत्येक पात्राची चित्रपटाशी एक वेगळीच बांधीलकी होती, कारण त्यांनी ते सर्व स्वत: भोगले होते आणि यामुळे त्यांचा अभिनय हा मनाचा ताबा घेतो. मुख्य व्यक्तीरेखेसाठी आम्ही खूप ऑडीशन्स घेतल्या पण उपयोग झाला नाही, शेवटी स्वत: अभिनय करण्याचा निर्णय मी घेतला.

२. चित्रपट - चिवटी

उपस्थिती - राजकुमार तांगडे (दिग्दर्शक), कैलास सानप व अजिनाथ ढाकणे (निर्माते), संभाजी तांगडे, किशोर उढाण, अश्विनी भालेकर, मिलिंद शिंदे, योगेश सिरसाठ, विष्णू केदार, गजेंद्र तांगडे (कलाकार) व नरेंद्र भिडे (संगीतकार)

- नाटकाच्या पलीकडील गोष्ट सांगण्याचा प्रयत्न म्हणजे 'चिवटी'. एकाच फ्रेममधून अनेक गोष्टी सांगण्याचा प्रयत्न आम्ही या चित्रपटाच्या माध्यमातून केला आहे. काल्पनिक कथेवर आधारित चित्रपट मला करायचा नव्हता म्हणून माझ्या आजूबाजूला घडणा-या गोष्टीवर भाष्य करण्याचा एक प्रयत्न या चित्रपटातून केला असल्याचे यावेळी 'चिवटी'चे दिग्दर्शक राजकुमार तांगडे यांनी सांगितले.

- ऊस तोड कामगारांच्या व्यथा, व्यवस्थेतून भरडला जाणारा हा समाज, त्यांच्या समस्या यांवर कारणमीमांसा करण्याचा प्रयत्न या चित्रपटाच्या माध्यमातून करण्यात आला आहे.

- डोक्यातली पटकथा कागदावर उतरवीत गेलो तब्बल पाच वर्षे यावर काम करत चालू होते. प्रत्येक नवा सीन एक एक गोष्ट आमच्यासाठी उलगडत गेला, असे यावेळी राजकुमार यांनी नमूद केले.

- चित्रपटात काम करणारा प्रत्येक कलाकार हा स्वत: त्या विषयाशी निगडीत असल्याने त्याची खूप मदत झाली.

- चित्रपटात तब्बल १५० ते २०० जणांचे कास्टिंग केले गेले. काम करणा-या प्रत्येक व्यक्तीचा व माझ्या चित्रपटातील पात्राचा प्रत्येकाचा स्वभाव मला आधीच माहित होता त्यामुळे काम करणे सोपे गेले.

- चित्रपटात कोणा एका नायकाची नाही तर जगण्याची गोष्ट सांगितली आहे. त्यामुळे सर्वांचे प्रयत्न हे चित्रपट रुपात एकत्रित झाले आहेत. मानवी वेदना व यांत्रिकपणा यांचा मेळ या चित्रपटात पहायला मिळेल.

- चित्रपटाचे संगीत दोन भागांमध्ये असून उसाच्या मळ्यातून वाहणा-या पाण्याच्या आवाजाचा वापरही आम्ही संगीत म्हणून केला आहे, असे नरेंद्र भिडे यांनी नमूद केले.

३. चित्रपट - टॉल टेल्स

उपस्थिती - विका कॅर्केस (अभिनेत्री)

- 'टॉल टेल्स' चित्रपटात रोमॅन्टिक हिस्टॉरिक थ्रिलरचे दर्शन आपल्याला घडते. १९४५ दरम्यान दुस-या महायुद्धा नंतरच्या काळातील गोंधळात ही कथा घडते. त्या काळातील

गोंधळाच्या परिस्थितीचा फायदा घेणारी एक व्यक्ती कशी नागरीकांना फसवून त्यांचा आर्थिक गैरफायदा घेते हे या चित्रपटामध्ये दाखविण्यात आले आहे. शेवटी ती व्यक्ती अशीच एका महिलेला फसवीत असताना तिच्या प्रेमात पडते मात्र तिचे पितळ उघडे पडते आणि त्यातून तीन पात्रांमधील भावनिक गुंतागुंत आणि सामाजिक परिस्थिती यांचे दर्शन आपल्याला या चित्रपटात घडते. विका कॅर्कस यांनी या चित्रपटात मुख्य भूमिका केली असून त्यांनी ती करताना समोर आलेली आव्हाने उपस्थितांना सांगितली.

४. चित्रपट - मोझाईक पोट्रेट

उपस्थिती - वँग जियांग (निर्माते)

- चीन मधील एका शहरात १४ वर्षांची मुलगी गर्भवती रहाते ही बातमी तेथील स्थानिक वृत्तपत्रात छापून येते. या बातमी मागील सत्यता पडताळण्यासाठी व त्या बातमीचा मागोवा घेत एका पत्रकाराला अनेक गोष्टींचा शोध लागतो व त्यामुळे त्या शहरातील सामाजिक परिस्थिती समोर येते अशी कथा या चित्रपटात सांगण्यात आली आहे.

- या चित्रपटाचे निर्माते वँग जियांग म्हणाले की चीनमध्ये वृत्तपत्रांना स्वातंत्र्य नाही त्यामुळे जी बातमी छापून आलेली असते तीच खरी मानली जाते. त्यामुळे अनेक वेळा त्या बातामीमागील सत्य समोर येत नाही त्याचा मागोवा घेणा-या गोष्टीची ही एक कथा आहे. चीनमधील सरकार व पोलीस यंत्रणा यांची मंजुरी मिळाली नसल्याने हा चित्रपट अद्याप चीन मध्ये प्रदर्शित होऊ शकला नाही.

५. मार्केट

उपस्थिती - प्रदीप कुरवाह (दिग्दर्शक)

- ईशान्य भारतातील एक गजबजलेले मार्केट, त्यातील कथा ‘मार्केट’ या चित्रपटात दाखविण्यात आल्या असल्याचे दिग्दर्शक प्रदीप कुरवाह यांनी सांगितले.

- आपण मार्केट पाहिलेले असते, आपल्याला त्याच्या गल्ली, बोळा माहिती असतात पण याच गल्ली बोळातील कथा सांगण्याचा प्रयत्न या चित्रपटात दिग्दर्शकाने केला आहे.

- मार्केटची परिस्थिती, त्या ठिकाणी घडणा-या गोष्टी या रोजच बदलत असल्याने या चित्रपटाला जणू एक माहितीपटाचा फॉरमॅट आला आहे. चित्रपटातील प्रत्येक पात्राला

आम्हाला ट्रेनिंग द्यावे लागले. मुळात चित्रपटातील कथा ही त्यांचीच रोजची कथा असल्याने ते करणे आम्हाला तुलनेने सोपे गेले. प्रत्येक पात्रासाठी आम्ही रिहर्सल्स घेतल्या आणि त्याचा उपयोगही झाला. मार्केटमधील या कथांद्वारे माझेही मार्केट सोबत एक नाते तयार झाले आहे.

६. आनंदी गोपाळ -

उपस्थिती- समीर विद्वांस (दिग्दर्शक), ललित प्रभाकर व भाग्यश्री मिलिंद (कलाकार)

- भारतातल्या पहिल्या महिला डॉक्टर डॉ. आनंद गोपाळ जोशी यांची कथा ‘आनंदी गोपाळ’ या चित्रपटात सांगितली आहे.

- विषय आणि आशय दोन्हीची सांगड घालत १९ व्या सुरुवातील महाराष्ट्रातील सामाजिक परिस्थिती व त्या काळातील एका ध्येयवेड्या दांपत्याची कथा यामध्ये सांगण्यात आली आहे. गोपाळ व आनंदी जोशी यांबद्दल लहानपणापासून आपण अनेक गोष्टी, माहिती ऐकलेली असते त्यामुळे ही गोष्ट उभी करताना दोन्ही पात्रांना एकत्र बांधण्याचा प्रयत्न केला. त्या काळातील स्त्री- पुरुष यांची मानसिकता याबरोबरच शिक्षणाची परिस्थिती, शिक्षणाबद्दलची मानसिकता समजून घेण्याचा आम्ही आधी प्रयत्न केला, त्यानंतर ते चित्रपटातून मांडले, असे समीर विद्वांस यांनी सांगितले.

- गोपाळ जोशी आणि आनंदी जोशी यांनी एकमेकांना लिहिलेली पत्रे आमच्याकडे होती. यामुळे त्या दोघांमधील नाते समजायला आम्हाला त्या पत्रांचा उपयोगी झाला. क्रांतीकारी, त्यांचे विचार यांचे मला नेहमीच कौतुक वाटत आले आहे. त्यांना एकमेकांची साथ होती मात्र इथे गोपाळ जोशी एकटे लढत होते. त्यांचा लढा दाखविण्याचा हा प्रयत्न आहे, असे ललित प्रभाकर याने नमूद केले.

- यमुना या मुली पासून डॉ. आनंदी जोशी यांचा प्रवास मला स्वत:ला प्रेरणादायी होता. आनंदी जोशी यांचे मूल गेल्याची घटना मनाला भिडणारी होती, असे भाग्यश्री मिलिंद यांनी सांगितले.

- आनंदी गोपाळ चित्रपटाचा प्रवास हा शिक्षक - विद्यार्थी, नवरा - बायको आणि मैत्री असा होता. अनेकदा हा प्रवास उलटा असतो मात्र गोपाळ आणि आनंदी यांचा प्रवास असा झाला असे समीर विद्वांस यांनी सांगितले.

७. ट्रीज अंडर द सन

उपस्थिती - डॉ. बिजूकुमार दामोदरन (दिग्दर्शक)

- केरळमधील बॅक वॉटर प्रदेशात राहणा-या एका दलित कुटुंबाचे अतिवृष्टीमुळे खूप नुकसान होते, त्यांचे राहते घर, संपत्ती सगळे या पुरामध्ये वाहून गेलेले असते. त्यामुळे ते हिमाचल प्रदेशात स्थलांतरीत होतात. नवा प्रदेश, नवी भाषा, नवी सामाजिक परिस्थिती अशांचा सामना करणारे हे कुटुंब यांची कथा 'ट्रीज अंडर द सन' या चित्रपटात सांगण्यात आली असल्याचे दिग्दर्शक डॉ. बिजूकुमार दामोदरन यांनी सांगितले. ठिकाण बदलले तरी सामान्य माणसाचा जगण्याचा संघर्ष मात्र सारखाच असतो याचे दर्शन या चित्रपटातून घडविले असल्याचेही त्यांनी नमूद केले.